**PVG's**

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Unit Test I (2024-25)
## Standard - X

**Subject - Marathi** | **Marks - 20**
**Date - 10.8.2024** | **Time - 1.30 p.m. to 2.45 p.m.**

**प्र. १ खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

याच सुमारास मी शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराच्या पुलावर बहुधा रोज संध्याकाळी जात असे. तेथील कट्ट्यावर बसणे मला आवडे. एक दिवस काय घडले, की कडक थंडीच्या दिवसात एक म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे मी पाहिले.

दुसऱ्या दिवशी मी दोन शाली घेऊन ओंकारेश्वराच्या कट्ट्यावर आलो. तो म्हातारा होताच. त्याला दोन्ही शाली दिल्या, त्याने थरथरत्या हातांनी मला नमस्कार केला.

पुढे चार - पाच दिवस मला काही कामांमुळे संध्याकाळी ओंकारेश्वराला जाण्यास उसंत लाभली नाही. त्यानंतर मी नेहमीप्रमाणे ये - जा करत राहिलो. मग एकदम त्या भिक्षेकरी वृद्धाची आठवण आली. तो नेहमीच्या ठिकाणी नव्हताच. तेथील पुलावर चक्कर मारावी म्हणून मी उठलो व पुलावरून चालू लागलो.

पुलाच्या जवळपास मध्यावर तो भिक्षेकरी म्हातारा दिसला. मी लगबगीने त्याच्याकडे गेलो. पाहतो तो काय, तीच चिरगुटे अंगाखाली व अंगावर, तेच कुडकुडणे, तेच दीनवाणे जिणे !

मी म्हटले, ''बाबा तुम्ही मला ओळखले ?''

त्याने नकारार्थी मान हलवली.

मग मीच म्हटले, ''बाबा, पाच - सहा दिवसांपूर्वी मी तुम्हांला दोन शाली दिल्या होत्या. आठवते ?''

यावर म्हातारा खुलला व पुन्हा हात जोडून म्हणाला, ''हे भल्या माणसा, तू लई मोठा! म्यास्नी शाली दिल्या ! पण बाबा, म्या भिकाऱ्याला शाली कशा शोभतील? त्या शोभेपेक्षा पोटाची आग लई वाईट ! मी शाली इकल्या व दोन - तीन दिवस पोटभर जेवून घेतलं बाबा! आमचं हे असलं बिकट जिणं ! तुझं लई उपकार हायेत बाबा.

शालीची शोभा आणि ऊब व पोटाची आग आणि अन्नाची ऊब !

भुकेल्यास अन्न दयावे, तहानलेल्यास पाणी दयावे आणि हेही जमले नाही, तर अभाग्यांना सन्मानाच्या शाली तरी दयाव्यात!

**१) आकृतिबंध पूर्ण करा** **(१)**

| | | |
|---|---|---|
| | भिक्षेकरी असा होता ............ | |

**२) एका वाक्यांत उत्तरे लिहा.** **(२)**

अ) लेखक रोज संध्याकाळी कोठे फिरायला जात?

आ) अभाग्यांना काय दयावे, असे लेखक म्हणतात ?

३) स्वमत - 'भिक्षेकऱ्याने केलेला शालींचा उपयोग' या विषयी तुमचे मत लिहा. **(२)**

**प्र. २ खालील अभंग वाचून दिलेल्या कृती पूर्ण करा.**

अग्निमाजि पडे बाळू।
माता धांवें कनवाळू ।।१।।

तैसा धांवें माझिया काजा।
अंकिला मी दास तुझा ।।२।।

सर्वेचि झेंपावें पक्षिणी ।
पिलीं पडतांचि धरणीं ।।३।।

भुकेलें वत्सरावें ।
धेनु हुंबरत धांवे ।।४।।

वणवा लागलासे वनीं ।
पाडस चिंतीत हरणी ।।५।।

नामा म्हणे मेघा जैसा ।
विनवितो चातक तैसा ।।६।।

**१) खालील चौकटी पूर्ण करा.** **(१)**

अ) कवितेतील माता व हरिणीचे वर्णन करणारे शब्द

१) माता - [ ]

२) हरिणी - [ ]

**२) कोण ते लिहा.** **(१)**

अ) पृथ्वीवर झेपावणारी - [ ]

ब) मेघाची वाट पाहणारा - [ ]

**३) शब्दांचे अर्थ लिहा.** **(१)**

अ) वणवा

ब) विनवितो

४) सर्वेचि झेंपावें पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं ।। **(२)**
भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धांवे ।।
या ओळींचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. ३) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(४)**

१) टिपा लिहा - डॉ. होमी भाभा

२) 'आधी केले मग सांगितले' या उक्तीची यथार्थता तुमच्या शब्दांत लिहा.

३) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते? हे पाठाच्या आधारे लिहा.

**प्र. ४ अ) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.** **(१)**

१) उपोषण २) रस्ता

**अ) खालील शब्दांचे विरुदार्थी शब्द लिहा.** **(१)**

१) तृप्त X २) वृद्ध X

**इ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.** **(१)**

१) तो मुलगा गरिबांना मदत करतो.

**३) खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (कोणतेही २)** **(२)**

१) मूठभर मांस चढणे

२) अंगाचा तिळपापड होणे

३) सुरुंग लावणे

**४) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(१)**

१) व्रत मोडणे - ☐

२) लेखन करणारा - ☐

❖❖❖